# समाजस्वास्थ्य

संपादक
र. धों. कर्वे, एम. ए.

वर्ष २५, अंक १२ वा | १५ जून १९५२ | किंमत ४ आणे



# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | विवाह आणि प्रजोत्पत्ति–१ ... ... | २२१ |
| २. | यूनोचा गुन्हा ... ... ... | २२७ |
| ३. | कायद्याचा अनपेक्षित परिणाम ... ... | २२८ |
| ४. | ग्रंथपरीक्षण ... ... ... ... | २२८ |
| ५. | पत्रव्यवहार ... ... ... ... | २३२ |
| ६. | शारदेचें पत्र ... ... ... ... | २३६ |



## अेजंटांचीं नांवें

**मुंबई** : श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें** : अेल्. के. जोशी, बुकसेलर.
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**अहमदनगर** : पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

**निपाणी** : के. एस्. बळगुर्गी

**कुमठा** : आर्. एम्. कामत

**गोकाक** : पी. एम्. शिरगांवकर

नवमतवादी मित्रमैत्रिणींच्या जोडीला दुसऱ्या जोड्यांची अगर मैत्रिणींची **ओळख पाहिजे**. मैत्रिणींना आर्थिक साह्य. S c/o **समाजस्वास्थ्य**.

**मैत्रीण पाहिजे**. सुशिक्षित तरुणास मधून मधून कांही वेळ अेकत्र घालवण्याकरतां तरुण मैत्रीण पाहिजे. आर्थिक मदतीची अपेक्षा असल्यास कळवावी. T c/o **समाजस्वास्थ्य**.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# विवाह आणि प्रजोत्पत्ति–१

विवाहसंस्था म्हणजे स्त्रीपुरुषांच्या समागमाला कांही अटींवर परवानगी देणारी संस्था. ही वेगवेगळ्या देशांत वेगवेगळ्या स्वरूपाची असली, तरी तिला कायद्याचा किंवा परंपरेचा आधार असल्यामुळें तिला कायदेशीर स्वरूप प्राप्त होतें. या अटी देशकालमानाने बदलल्या तरी वरील व्याख्येंत सर्व प्रकारांचा समावेश होईल.

पुष्कळ ठिकाणीं स्त्रीपुरुषांचा समागम म्हणजे पाप अशी समजूत दिसते, पण त्याला अजीबात बहिष्कार घालून चालत नाही, म्हणून मोठ्या मिनतवारीने त्याला विवाहामार्फत परवानगी दिलेली आढळते आणि यामुळेंच या अटी न पाळतां जे समागम होतील त्यांच्यावर लोकांची करडी नजर असते. अविवाहित स्त्रीला मूल झालें तर तें हलक्या प्रतीचें समजतात, वेश्यांना आणि त्यांच्या गिऱ्हाअिकांना हलकट समजतात, त्यांच्या विरुद्ध नाना प्रकारची छळणूक करणारे कायदे करतात.

कोणताही गट ज्या वेळीं अशा प्रकारचे कायदे करतो, तेव्हां अशा कायद्यांनी आपल्या गटांत चांगली प्रजा निर्माण होऊन त्याची सर्वतोपरि भरभराट व्हावी याच हेतूने करतो. अमुक अेका ठराविक प्रकारच्या समागमालाच परवानगी देणें, अितर प्रकारांवर बहिष्कार घालणें आणि कुटुंबसंस्थेला पाठिंबा देणें, याचा जर अर्थ हा नसेल, तर त्याला कांही अर्थच नाही. पण आतां असा विचार करण्याची वेळ आली आहे की आमच्या प्राचीन पूर्वजांनी

विवाहसंस्था निर्माण करतांना जे नियम केले, त्यांत कांही चूक तर नाही ना? त्यांनी खरोखरच समाजाचा कांही फायदा झाला आहे आणि यापुढेंही तसाच फायदा होत राहणार आहे असें जर दिसत नसेल, तर या सामाजिक निर्बंधांचा फेरविचार करण्याची जरूर आहे हें उघड होईल.

आतांपर्यंतच्या विवेचनावरून अेक गोष्ट उघड झाली आहे की हे जुने नियम करणारांनी प्रजोत्पत्ति आणि संभोगसुख या दोहोंचा घोटाळा केलेला आहे आणि यामुळेंच सर्वत्र ढोंगाचा प्रसार झाला आहे. मनुष्य प्रजोत्पत्तीकरतां संभोग करीत नाही, तो सुखाकरतां करतो, हें कोणालाही समजण्यासारखें आहे. तो सुखाकरतां नसावा आणि प्रजोत्पत्तीपुरताच असावा, असें कांही खुळे म्हणतात, पण त्यांना मनुष्यस्वभावाचें ज्ञान नाही असेंच म्हणावें लागतें. अशा खुळ्या लोकांचा उपदेश कोण अैकेल? प्रजोत्पत्ति हा केवळ संभोगांतील अेक अपवाद आहे, त्याला त्याचा उद्देश म्हणणें हें निव्वळ ढोंग आहे. पण कांही धर्म हें ढोंग आपल्या अनुयायांवर लादतात. धर्मांनें ढोंगाचा प्रसार होतो तो असा. विवाहसंस्थेचे परिणाम उत्तम होतात असें म्हणायला कांही आधार असता, तर गोष्ट वेगळी होती. पण तसा आधार दिसत नाही.

विवाहसंस्थेची बरोबर कल्पना येण्याकरतां तिच्या वेगवेगळ्या प्रकारांकडे अैतिहासिक आणि तुलनेच्या दृष्टीने पाहणें जरूर आहे. केवळ हल्लीची स्थिति पाहिल्यास नीटशी कल्पना येणार नाही. कित्येक शतकें जनानखान्यांत कोंडून राहिलेल्या मुसलमान स्त्रियांना देखील आतां स्वातंत्र्याची अिच्छा झाली आहे आणि तुर्कस्थानांत त्यांची या कोंडवाड्यातून मुक्तता होऊन आतां त्यांना बुरखाही घ्यावा लागत नाही. चीनमधील बायकांनी आतां पाय चिंबवण्याची पद्धत फेकून दिली आहे आणि अमेरिकेच्या सांस्कृतिक हल्ल्यामुळें जपानांतील 'योशिवारा' नांवाचा वेश्यांचा मोहल्ला लुप्त होऊं पहात आहे. मिशनऱ्यांनी अबरदस्तीने केलेल्या अनेक तथाकथित सुधारणांमुळें पॉलिनीशिआमधील कामस्वातंत्र्य नाहीसें होत आहे, अितकेंच नव्हे तर ते लोकच नाहीसे होण्याच्या मार्गाला लागले आहेत, असें आर. अेल. स्टीव्हनसन

यांनी लिहिलें आहे. आपल्याकडे पाहिलें तर आज पिढ्यान्‌पिढ्या रखेल्यांचा धंदा करणाऱ्या गोवेकरणी तो धंदा सोडून विवाह करीत आहेत. गोऱ्यांकडून आलेल्या या सुधारणेच्या लाटेंत हिंदूंची अनादि कालापासून चालत आलेली बहुपत्नीकत्वाची चाल कायद्याने नाहीशी होऊं पहात आहे. ही अेक लाट आहे, तिने होणाऱ्या उलथापालथी कायम टिकतील की काय हें सध्याच कळणार नाही.

प्राथमिक गटांत विवाहित स्त्री ही मनुष्य नसते. घरांतील सामाना-सारखीच ती अेक वस्तु असते आणि नवऱ्याला अितर सामानाप्रमाणेंच तिचीही व्यवस्था लावतां येते. विवाहाचे सर्व प्रकार येथें सांगतां येणार नाहीत. पण कित्येक ठिकाणीं अेका कुटुंबांतील बहिणींची दुसऱ्या कुटुंबांतील भावांशीं लग्न करण्याची पद्धत होती, म्हणजे त्यांतल्या कोणत्याही भावाचा कोणत्याही बहिणीशीं नवराबायकोचा संबंध असे. अेका गटांत आपआपसांत लग्नें व्हायचीं नाहीत, असा नियम पुष्कळ ठिकाणीं असे व आपल्याकडील गोत्रासंबंधी नियम यांतूनच निघालेले आहेत. कित्येक ठिकाणीं हे नियम अितके कडक होते की मनाप्रमाणें निवड करण्याचें स्वातंत्र्य कोणालाही नव्हतें.

ऑस्ट्रेलिआंतील प्राथमिक गटांसंबंधी माहिती १८ व्या शतकांतील प्रवाशांनी लिहिलेली आहे. तेथें बायको व मुलें हीं पुरुषाची मालमत्ता सम-जली जात असे आणि तो त्यांना बाळगलेल्या पशूंप्रमाणें वागवीत असे. क्षुल्लक कारणाकरतां देखील त्यांना मार बसत असे व त्यांना सर्व कष्टाचीं कामें करावीं लागत असत. अितरही पुष्कळ गटांत अशीच पद्धत असे. डच लोकांनी जेव्हां सुमात्रा बेट काबीज केलें, तेव्हां तेथील रहिवाश्यांनी आपल्या सैन्याच्या अग्रभागीं बायकामुलांना ठेवलें होतें, उद्देश हा की शत्रूचा मारा प्रथम त्यांच्यावरच व्हावा.

आज विसाव्या शतकांत पाश्चात्य देशांत स्त्रीला याच्या बरोबर उलट वागवतात. तिच्या मिळकतीवर तिचा स्वतःचा हक्क असतो आणि तिला वेगळा धंदा करून आपली मिळकत वाढवतां येते. तिला आपलें नांव बदलावें लागत नाही अितकेंच नाही तर सर्व बाबतींत आपल्याला पुरुषांसारखेच हक्क असले

पाहिजेत असा तिचा दावा असतो आणि तिला ते हक्क हळूहळू मिळतही आहेत.

अर्थात् सर्वच देशांत अजून अशी स्थिति नाही. या दोन टोंकांच्या मधें निरनिराळ्या पायऱ्या बहुतेक देशांत सांपडतात. पण ज्यांना विवाहसंस्था कायम ठेवायची अिच्छा आहे, त्यांना असा मोठा प्रश्न पडतो की स्त्रियांना आणि पुरुषांना सारखेच हक्क दिल्यावर ही संस्था कितपत टिकूं शकेल? कुटुंबांत पुरुषाची हुकूमत चालणार नाही आणि स्त्रीचीही चालणार नाही, अशा स्थितींत मतभेद उत्पन्न झाल्यास निर्णायक मत कोणालाच नाही. ही अेक मोठीच अडचण आहे. तेव्हां कुटुंबसंस्था मोडून तिच्याअैवजीं दुसरी अेखादी व्यवस्था पसंत करावी लागेल असा बराच संभव आहे. तथापि याचा आणखी विचार करणें जरूर आहे.

आरंभीं स्त्री ही पुरुषाची मालमत्ता असे हें वर पाहिलेंच आहे. कांहीही कारणाशिवाय आणि मोबदल्याशिवाय तिला घालवून देतां येत असे, उसनी देतां येत असे, विकतां येत असे, ठार मारतां येत असे. मुली बक्षीस म्हणून देण्याचीही पद्धत अेके काळीं होती. चीनमधें नवा बादशहा गादीवर आला म्हणजे मोठमोठे सरदार आपल्या मुलींना त्याला दाखवायला नेत असत आणि त्यांतून तो स्वतःकरतां बायका निवडीत असे. यहुदी, मुसलमान आणि अितर पुष्कळ लोकांत लग्नाच्या बाजारांत मुलींची किंमत कमी होऊं नये म्हणून त्या वयांत येअीपर्यंत कोणाच्या दृष्टीस पडूं नये अशी व्यवस्था असे. लग्नाचे वेळीं हुंडा म्हणून केवळ पैसाच नव्हे तर अितर सामानसुमान तिच्या बापाला बक्षिस म्हणून मिळत असे. नंतर कांही रकम स्त्रीधन म्हणून मुलीलाच देण्याची चाल पडली. ही चाल पूर्वी सर्वत्र रूढ होती. मुलीकडून हुंडा घेण्याची चाल त्या काळीं नव्हती, ती पुष्कळच अलीकडची आहे.

हिंदुस्थानांत मनुस्मृतीप्रमाणें मुलगी ही बापाची मालमत्ता असे, पण लग्नाचे वेळीं तो आपला हक्क नवऱ्याला अर्पण करीत असे. लग्नाचे वेळीं बापाला मिळालेल्या पैशाचा उपयोग लग्नाच्या खर्चाकडे किंवा मुलीकरतां

दागिने विकत घेण्याकडे होत असे. मंगळसूत्र ही नवऱ्याच्या मालकीची खूण आहे आणि तो मेला तर ती काढून टाकतात. मुलगी विकत घेण्याची ही चाल प्राचीन काळीं सर्व जगभर होती आणि अितर कोणत्याही बाजारी सवदाप्रमाणेंच हुंड्याच्याही बाबतींत घासघीस चालत असे. कित्येक संशोधकांना कांही मुसलमानांत अशी चाल आढळली की बायको कांही काळापुरती भाड्याने आणायची, आणि तिला झालेली मुलें औरस समजत असत.

आफ्रिकेंत कित्येक गटांत शत्रूला खंडणी देणें असल्यास ती स्त्रियांच्या रूपाने देण्याची चाल होती आणि मुली विकतांना त्यांच्या संमतीची जरूर नसे. बायकांची अदलाबदल करण्याचीही चाल कित्येक ठिकाणीं असे. हिंदुस्थान, चीन व अरबस्तान या देशांत बालपणींच मुलांचीं लग्नें लावून देण्याची पद्धत होती. कांही गटांत अेखाद्या मनुष्याने खून केला तर त्याला आपली अेखादी बहिण मृताच्या कुटुंबाच्या हवालीं करावी लागत असे आणि तिला मूल झाल्यावर तें ऋण फिटलें असें समजत असत.

नवरा मेला तर त्याची विधवा अेका वर्षाने त्याच्या खालच्या भावाची बायको आपोआप होते, अशी चाल पुष्कळ गटांत आढळते. आणि लग्न होण्यापूर्वी वधू मेली तर तिची जागा तिची बहिण घेत असे.

बायको विकत घेतलेली असल्यामुळें ती नकोशी झाल्यास केव्हांही नवऱ्याच्या मर्जीप्रमाणें तिला टाकून देतां येत असे आणि अजून मुसलमानांत असाच कायदा आहे. अर्थात् तिला मात्र नवऱ्याला सोडतां येत नाही, कारण ती विकत घेतलेली वस्तु असते, तिला मर्जी नसते. नवरा मेल्यावर त्यांची कांही मालमत्ता त्याच्याबरोबर पुरण्याची किंवा जाळण्याची चाल आढळते. हिंदुस्थानांतील सतीची चाल याच प्रकारची आहे. मृताबरोबर त्याच्या नेहमीच्या उपभोगाच्या वस्तूंचा नाश केल्याने त्या त्याच्याबरोबर स्वर्गांत जातात आणि तेथें त्याला त्यांचा उपयोग होतो, अशी कल्पना याच्या मुळाशीं होती. स्त्री ही अेक उपभोग्य वस्तु असल्यामुळें तिलाही जाळीत असत. रखेल्यांनाही अशा तऱ्हेने जाळीत.

स्त्री या वस्तूचा अेक उपयोग प्रजोत्पत्ति हा असल्यामुळें व्यभिचार हा सर्वत्र गुन्हा मानला गेला, कारण तो मालकीहक्काविरुद्ध अत्याचार होता. अिंग्लंडांत अेके काळीं चोरीला देखील फाशीची शिक्षा असे, हें लक्षांत घेतलें तर या गुन्ह्याचें महत्व समजेल. कित्येक ठिकाणीं दुसऱ्याची बायको वापरणाराला दंड भरावा लागत असे, किंवा नवी बायको विकत घेऊन ती नवऱ्याला द्यावी लागत असे. स्त्रियांना जनानखान्यांत बंद ठेवण्याचें अेक कारण हेंच होतें की त्या लोकांच्या नजरेला पडूं दिल्याने व्यभिचाराचा संभव वाढतो. ही चाल मुसलमानांतच होती असें नाही. जनानखान्याला संस्कृत शब्द 'अवरोध' असा आहे आणि याचा अर्थ बंदी असाही आहे. विवाहित स्त्रीशीं संबंध ठेवणें हा स्वतंत्र स्त्रीवर बलात्कार करण्यापेक्षांही मोठा गुन्हा आहे, असें ग्रीक लोक समजत असत. कारण पहिला गुन्हा मालकीहक्काविरुद्ध आहे. अर्थात् स्त्रीने जर नवऱ्याच्या संमतीने दुसऱ्या पुरुषांशीं संबंध ठेवला, तर तो गुन्हा होत नाही हें ओघानेच येतें, कारण मालकीची वस्तु दुसऱ्याला देण्याचा हक्क कोणालाही असतोच. अजून देखील सुधारलेल्या म्हणवणाऱ्या देशांत व्यभिचाराचा कायदा असाच आहे. नवरा कोठें लांब जात असेल तर बायकोच्या अिंद्रियाला कुलूप लावतां येअील अशा प्रकारचा अेक कमरपट्टा कांही देशांत वापरीत असत. यांत या दृष्टीने चमत्कारिक कांहीच नाही, कारण बहुमोल वस्तु कुलुपांत ठेवण्याची पद्धतच आहे.

नकोशा झालेल्या बायका विकण्याची चाल रशिया, चीन, नॉर्वेजिआ आणि अिंग्लंडमधें अेकोणिसाव्या शतकापर्यंत होती. तिला गाअीप्रमाणें गळ्यांत दावें घालून बाजारांत नेत असत आणि ती विकत घेणाराची कायदेशीर बायको होत असे. नेपोलिअनने बायकांची तुलना बागेंतील फळझाडांशीं केली होती आणि म्युसोलिनी व हिटलरसारख्या आधुनिक हुकुमशहांनी स्त्रियांना गुलामांप्रमाणेंच वागवलें. स्त्रियांना कोणतेही हक्क देण्याची त्यांची तयारी नव्हती.

---

# यूनोचा गुन्हा

'यू. अन्. ओ.' या आद्याक्षरांनी ओळखली जाणारी जी राष्ट्रांची संघटना गेल्या युद्धानंतर स्थापन झालेली आहे, तिचा उद्देश युद्धापूर्वीच्या 'लीग ऑफ नेशन्स' सारखाच राष्ट्रांचे आपआपसांतले प्रश्न सामोपचाराने सोडवण्याचा आहे, परंतु तो फारसा यशस्वी होत नसल्याने हीही संस्था अितर भानगडीच जास्त करीत असते. जगाचें आरोग्य संभाळणें हे तिचें अेक कर्तव्य समजतात, परंतु यांत धार्मिक लोकांचें वजन असल्यामुळें हा उद्देश नेहमींच सिद्धीस जातो असें नाही. आपल्या आरोग्यमंत्री राजकुमारी अमृत कौर यांनी अमेरिकेंतून डॉ. स्टोन यांची आयात करण्याचा मूर्खपणा याच संस्थेमार्फत केला आणि त्यांनी संततिनियमनाकरतां पोपला पसंत असलेली (खरें पाहिलें तर पोपला तीही पसंत नाही, कारण गांधींप्रमाणेंच पोपलाही प्रजोत्पत्तीचा उद्देश असल्याशिवाय समागम वर्ज्य वाटतो, आणि त्या पद्धतीचा उद्देश असा समागम शक्य करणें हा आहे) पद्धत येथें पुरस्कारली. अशाच जातीचा आणखी अेक मूर्खपणा म्हणजे फ्रान्समधें जीं सरकारी देखरेखीखालीं वैद्यकीय तपासणीची सक्ती असलेलीं वेश्यागृहें होतीं, तीं या संस्थेच्या दडपणामुळें लोकमताची पर्वा न करतां फ्रेंच सरकारने बंद केलीं. (१९४८). नंतर १९५० च्या आरंभीं डा. नॉर्मन हेअर यांनी आपल्या द्वैमासिकांत फ्रान्समधें रोगांचा अतोनात प्रसार झाल्याची बातमी दिली आहे. धार्मिक लोकांना नेहमी गुप्त रोग म्हणजे अनीतीबद्दल अीश्वराने केलेली शिक्षा वाटते, तेव्हां वैद्यकीय तपासणीने हे रोग कमी झालेले त्यांना खपत नाहीत आणि अलीकडे या रोगांवर नवीन उपचार बरेच यशस्वी झाल्यामुळें त्यांना फार दुःख होतें. बिचारा अीश्वर ! शास्त्रीय ज्ञानापुढें त्याचें कांही चालत नाही.

---

# कायद्याचा अनपेक्षित परिणाम

नीतिबाजांचे जे वेगवेगळे उपद्याप चालू असतात, त्यांना पुष्कळ वेळां कायद्यांचा पाठिंबा मिळतो, परंतु कायद्याचे परिणाम कधीकधी विलक्षण होतात. आफ्रिकेंत व अमेरिकेंतही काळ्या गोऱ्यांचे शरीरसंबंध नेहमी होत आले आहेत, पण अलीकडे दक्षिणआफ्रिकेंत वर्णद्वेष अितका वाढला आहे की गोऱ्या पुरुषांनी काळ्या स्त्रियांशीं संबंध ठेवणें हा गुन्हा झाला आहे. कोणत्याही बंदरांत बोट आली, म्हणजे जमीनीवर उतरल्याबरोबर खलाशांचा पहिला उद्योग म्हणजे वेश्यांकडे जाणें, कारण त्यांना कित्येक महिने समगमाची संधि मिळालेली नसते. दक्षिणआफ्रिकेंतही बोटींवरचे खलाशी हाच उद्योग करतात आणि ते काळ्या वेश्यांकडे गेल्यास त्यांना बरीच शिक्षा होते. यावर उपाय म्हणून दरबान बंदरांतील बोटींवरील खलाशांना गेल्या सालीं पुढील पत्रकाच्या छापील प्रती वांटण्यांत आल्या. 'या शहरांत काळ्या स्त्रियांशीं संबंध करणें हा गुन्हा आहे आणि तसें केल्यास तुम्हाला विनाकारण शिक्षा होअील, तुमचे पैसे दंड देण्यांत खर्च होतील आणि तुरुंगांत गेल्यास तुमची बोट चुकेल. पण तुम्हाला त्यांच्याकडे जाण्याचें कारणच नाही. तुम्हाला पाहिजे तितक्या गोऱ्या स्त्रिया मिळतील.' यापुढें टेलिफोनचा नंबर दिलेला होता व तेथें टेलिफोन केल्यास तावडतोब अेक मोटर हजर होऊन तुम्हाला त्यांच्या भेटीला नेअील, अशी माहिती होती. या कायद्याने नीतिबाजांनी काय साधलें? अर्थात् गोऱ्या स्त्रियांचें गिऱ्हाअीक काळ्या स्त्रियांकडे जाऊं नये अितकें खात्रीने साधलें, पण त्यांचा उद्देश तोच होता का?

---

# ग्रंथपरीक्षण

१. **महात्मा गांधी** लेखक, ना. सी. फडके. प्रकाशक, अंजलि प्रकाशन लिमिटेड, वेस्टर्न अिंडिआ हाऊस, फिरोजशहा मेथा रोड, मुंबई–१. पृ. ११२, किं. दीड रु.

महात्मा गांधींचें हें चरित्र विद्यार्थ्यांकरतां लिहिलेलें आहे. त्यांत त्यांच्या आयुष्यांतील सर्व महत्वाच्या घटना दिलेल्या असून शिवाय शेवटीं 'गांधीजींची उपदेशवाणी', हा अेक वेगळा भाग जोडला आहे. नंतर ठळक घटनांची अेक तारीखवार यादी देऊन शेवटीं चरित्राच्या आठ प्रकरणांवर 'अभ्यासाचे पाठ' दिले आहेत. अर्थात् गांधी हे धार्मिक गृहस्थ होते, तेव्हां उपदेशवाणींत आलेलीं त्यांचीं मद्य, मांस, ब्रह्मचर्य वगैरेबाबतचीं मतें बुद्धिवाद्यांना पटण्यासारखीं नाहीत, अितकेंच नव्हे तर तीं शास्त्रीय दृष्ट्या खोटीं आणि आरोग्यदृष्ट्या हानिकारक आहेत. दुर्दैव अितकेंच की मोठ्या माणसांची मतें केवळ त्यांच्या मोठेपणावर खपतात, तीं बरोबर आहेत की चूक हें कोणी पहात नाही. चरित्रांची पद्धतच असते की नायकाचे फक्त गुण सांगायचे, दोष सांगायचे नाहीत, व त्याच पद्धतीने हेंही चरित्र लिहिलेलें आहे.

र. धों. क.

२. **किशोर कथा**, लेखक, ना. सी. फडके व सौ. कमला फडके. प्रकाशक वरीलप्रमाणें. पृ. १०४. किं. दीड रु.

या सहा निवडक कथा शालेय विद्यार्थ्यांकरतां अेकत्र केल्या आहेत असें प्रकाशकांचें म्हणणें आहे. मुलांसंबंधी कथा असल्या म्हणजे त्या मुलांना वाचण्यास योग्य आहेत असा गैरसमज पुष्कळांचा असतो, तसाच या प्रकाशकांचाही दिसतो. या सर्वच कथा मुलांना योग्य आहेत असें आम्हास वाटत नाही. उदाहरणार्थ 'कोंडमारा' या पहिल्याच कथेंत पुढील वाक्य आहे. (पृ. १०) 'तीं सारीं मुलं वयाने लहान होतीं आणि आपल्या हर्षखेदांचा जाहीर लिलांव कसा करावा त्याची मोठ्या माणसांची विद्या त्यांना माहीत नव्हती म्हणून, नाही तर परांजप्यांचं बिऱ्हाड त्या घरांतून हाललें म्हणून त्यांनी शोकप्रदर्शक जाहीर सभाच भरविली असती.' हा विचार मुलांना समजण्यासारखा आहे काय? 'मालीने आणलेली दौलत' या कथेंत मालीला रस्त्यांत पैशांनी भरलेला कसा सांपडतो आणि ती तो मोठ्या हौसेने बापाच्या हवालीं करते, पण ते सगळे पैसे खोटे असतात. खोटे पैसे कोणीं जमा करून

त्याची थैली भरून ती रस्त्यांत हरवील ही घटना अशक्य दिसते. 'छडी लागे छम् छम्' या कथेंत अेका वर्गांतील मुलांमुलींनी वाह्यातपणा करून मास्तरणीची फजिती केली असें दाखवलें आहे. ही गोष्ट शालेय मुलांना वाचायला देणें म्हणजे मास्तरांची फजीती कशी करावी हें त्यांना शिकवणें आहे. पुस्तकाच्या शेवटीं सर्व गोष्टींवर अभ्यासाचे पाठ दिले आहेत. आमचे मतें या कथा मुलांना योग्य नाहीत. र. धों. क.

३. 'अिंडिया व्हर्सस अेम्. सी. सी.' टेस्टस, १९५१–५२ (अिंग्रजी) लेखक ना. सी. फडके. प्रकाशक वरीलप्रमाणें. पृ. ११६, किंमत अडीच रु.

१९५१–५२ सालीं झालेल्या हिंदुस्थान व अिंग्लंड यांच्यामधल्या क्रिकेट सामन्यांचें हें विश्लेषणात्मक वर्णन आहे. त्याला विजय हजारे यांची प्रस्तावना असून शिवाय नायडू, देवधर, मुष्ताकअली, वगैरे तज्ञांचे उत्तम अभिप्राय आहेत. र. धों. क.

४. **शाकुंतल.** लेखक, ना. सी. फडके, ( आवृत्ति २ री ). प्रकाशक वरीलप्रमाणें. पृ. १९७, किंमत ४ रु.

ही कादंबरी सरकारने जप्त केली होती, यामुळें तिची बरीच जाहिरात झालेली आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावर ही जप्ती उठली. सरकारच्या विरुद्ध प्रचार या कादंबरींत आहे असें लेखकाने स्वतःच सांगितलें आहे आणि याच कारणाने ती लोकप्रिय झाली असेल, परंतु अेरवीं या कादंबरींत विशेष आकर्षक काय आहे हें निदान आम्हास तरी कळत नाही. नायिकेची वागणूक बऱ्याच प्रसंगीं मूर्खपणाची आहे. राजकारणांत पडलेल्या पद्माकरावर तिचें प्रेम असतें, तरी त्याच्या तें लक्षांत आलें नाही या कल्पनेने ती भलत्याशीं लग्न करते. नंतर नवऱ्याचीं मतें पटत नाहीत म्हणून ती त्याला सोडून बापाकडे येते व तिची पद्माकराशीं गांठ पडून ती त्याला मदत करते आणि तिचें प्रेम त्याला माहीत असून त्याचेंही तिच्यावर प्रेम आहे असें तिला कळतें, परंतु त्याचा कांही उपयोग नाही हें ओळखूनच दोघेंही वागतात. तिचा नवरा लढाओवर गेलेला असतो, तो आंधळा होऊन परत येतो व तिचा बाप त्यालाही आपल्या-

कडे बोलावतो व त्याची काळजी घेणें ती आपलें कर्तव्य समजते. पद्माकरावर खटला झालेला असतांना तो निसटून पळून जातो व येथेंच कादंबरी संपते. ज्यांच्याबद्दल कांही सहानुभूति वाटते अशीं फक्त दोनच पात्रें यांत आहेत, अेक पद्माकर व अेक तिचा बाप. नायिकेची दया येते, पण तिच्याबद्दल आदर वाटत नाही. अेकंदरींत या कादंबरींत विशेष जीव नाही असेंच आमचें मत झालें. **र. धों. क.**

**५. माझ्या साहित्यसेवेंतील स्मृती**, भाग २ रा. लेखक, ना. सी. फडके, प्रकाशक वरीलप्रमाणें. पृ. २२८, किंमत ३ रु.

१९२६ ते १९३४ या कालखंडांतील २८ स्मृति या भागांत आल्या आहेत. प्रत्येकाचे स्वतःबद्दल बरेच गैरसमज असतात, त्याप्रमाणें या लेखकाचेही आहेत. ते सर्वच सांगण्यांत मतलब नाही व शिवाय ते मतभेदांच्या सदरांतही जाऊं शकतील. तथापि कांहींचा उल्लेख करावासा वाटतो. लेखकाच्या मतें ते संगीतांतले दर्दी आहेत, परंतु त्यांनी पृ. १३ वर जो पेटीचा पुरस्कार केला आहे, त्यावरून आम्हास तसें वाटत नाही. हिंदुस्थानी संगीताच्या दृष्टीने पेटीचे स्वर चुकीचे असतात हें त्यांनीही कबूल केलें आहे, पण ' हार्मोनिअमची हकालपट्टी केली पाहिजे अित्यादि घोषणा मला जरा अतिरंजित वाटतात,' असें ते म्हणतात. याचा अर्थ आम्ही असा करतों की पेटीचे स्वर चुकीचे आहेत हें त्यांना फक्त गणिताने समजतें, परंतु कानाने समजत नाही. त्यांनी पुष्कळ चांगलें संगीत अैकलें आहे आणि संगीताची परिभाषाही त्यांना माहीत आहे, परंतु स्वर चुकीचे असले तरी पेटी राहूं द्यावी असें जो म्हणतो, त्याला संगीतांतील तज्ञ समजणें आम्हांला तरी अशक्य वाटतें. तसेंच पृ. २२ वर ते म्हणतात की पाल्हाळाचा दोष त्यांना मुळींच खपत नाही व फक्त ' जादूगार ' कादंबरींत तो सकारण आलेला आहे, परंतु आम्हाला अजूनही त्यांच्या लिखाणांत बराच पाल्हाळ दिसतो. तथापि हें पुस्तक अत्यंत वाचनीय झालें आहे. त्यांच्यावर वाङ्मयचौर्याचा जो आरोप केलेला होता, तो आमचे मतें साफ खोटा आहे. **र. धों. क.**

# पत्रव्यवहार

१-

१. माझ्या अेका मित्राला तीन मुलें आहेत. त्याच्या म्हणण्याप्रमाणें तिन्ही मुलांच्या बाबतींत गर्भधारणा कोणत्या रात्रीं झाली तें उभयतां पति-पत्नींना संभोगाच्या वेळीं समजलें व पुढें त्याप्रमाणें ठराविक काळानंतर मुलांचा जन्म झाला. असें समजणें शक्य आहे काय? २. दिवस गेल्यावर बहुतेक स्त्रिया मला अितके महिने गेले व इतके दिवस गेले असें सांगतात. महिने सांगतां येतील, पण दिवस कसे सांगतां येतील? कारण कोणत्या दिवशीं गर्भधारणा झाली हें कसें सांगतां येअील? ३. मी अविवाहित असून माझें वय २५ आहे. मला संभोगाची अिच्छा अत्यंत तीव्रतेने होते व उत्थापनही होतें, परंतु अेकदां वेश्येकडे गेलों असतां तिने आंत गेल्यावर चटकन निजून लुगडें वर केलें, पण मला कांही करणें अशक्य झालें. मला हस्तमैथुनाची संवय आहे म्हणून असें झालें असेल का? यावर उपाय काय? ४. पुन्हां वेश्येकडे जाणें असेल तर काय करावें? दुसरें असें की वेश्या नीट उजेडांत पाहूं देत नाहीत व स्तनाग्रें देखील उघडीं करूं देत नाहीत. मला सदरहू वेश्या म्हणाली की आम्हालाच तुमच्यापेक्षां रोग न होऊं देण्याबद्दल काळजी घ्यावी लागते, तेव्हां चटकन उरका. ५. या वेश्यांच्या घरांतील स्थिति मीं चांगली अवलोकिली आहे. त्या अेकंदरींत निराश दिसतात. त्या संभोगाला तयार होतात त्या निव्वळ पैशासाठीं, त्यांत त्यांना स्वतःला कांही सुख होत असेल असें वाटत नाही. दारांत बसून येणाऱ्या जाणाऱ्या पुरुषांची मनधरणी करण्यांत त्यांना खरोखरच सुख वाटत असेल काय, याची जबरदस्त शंका वाटते. तारुण्य निघून गेल्यावर तर त्यांचे हाल कुत्रा खात नाही. आपण म्हणतां शेंकडा ९० वेश्या समागमांतील मजा लुटण्याकरतां हा धंदा पतकरतात. मला तर (मी बुद्धिवादी असून सुद्धां) अनुभव वेगळा आल्यामुळें हें पटत नाही. आपलें काय म्हणणें आहे? ६. माझें एका मुलीवर प्रेम बसलें आहे, पण ती मुलगी फार बदनाम झाली आहे. तिचें वय

२३–२४ आहे, दिसावयास सुंदर व लाघवी आहे. पण तिला मित्रमंडळी पुष्कळ आहे व नाटकांत वगैरे तरुणांच्या बरोबरीने कामें करते. अशा मुली शरीराने तरी कुमारिका असतील का ? या मुलीच्या बाबतींत याच कारणामुळें लग्न करण्याची हिंमत होत नाही. आपला ० ० ०

उ. १ व २. गर्भधारणा कोणत्या वेळीं झाली हें पुरुषाला कळणें अशक्यच आहे. कांही स्त्रिया मात्र आपल्याला कळलें असें म्हणतात, परंतु त्याबद्दलही आम्हांला शंका आहे. हे दोन्ही प्रश्न वास्तविक अेकच आहेत, कारण नक्की दिवस कळतो की काय, हीच शंका दोहोंच्याही मुळाशीं आहे. मला कळलें असें अेखादी स्त्री म्हणाली, तर तें अर्थातच असिद्ध करतां येणार नाही, पण बहुतेकांना तें कळत नाही हें निश्चित. ३. हस्तमैथुनाने असें होणार नाही, परंतु वेश्येशीं काय किंवा स्वतःच्या स्त्रीशीं काय, पहिल्या भेटीच्या वेळीं पुष्कळांचें असें होतें, परंतु संवय झाल्यावर तसें होत नाही. याला कोणताही उपाय नाही. पहिला समागम नीट पार पडेल की नाही, ही भीतीच याच्या मुळाशीं असते. ४. रोगांसंबंधी ती वेश्या म्हणाली त्यांत तथ्य आहे, कारण रोग जसे स्त्रियांपासून पुरुषांना लागतात, तसेच पुरुषांपासून स्त्रियांना लागतात. वेश्या चुंबन देखील घेऊं देत नाहीत अशी तक्रार अनेकांनी आमचेकडे केली आहे. याचेंही कारण तेंच. चुंबनाने रोग होण्याचा संभव जास्त असतो अशी त्यांची समजूत असते. अर्थात् ओठावर गर्मीचा व्रण असूं शकतो आणि तसा असेल तर चुंबनाने संसर्ग होईल. ‘ चटकन् उरका ’ म्हणण्याचें कारण गिऱ्हाअिकाकडून अगोदरच पैसे घेतलेले असल्यामुळें त्याला जास्त वेळ रमूं देण्यांत कांहीच फायदा नसतो. कित्येक वेश्या रोगांच्या भीतीने पुरा प्रवेशही होऊं देत नाहीत. अर्थात् अशा रीतीनें वागण्यांत धंद्याच्या दृष्टीने त्यांचें नुकसानच असतें, कारण अेकदां असा अनुभव आलेला मनुष्य तिच्याकडे पुन्हां जाणार नाही. परंतु मोठ्या शहरांत वस्ती अितकी असते की गिऱ्हाअीक पुन्हा येणार नाही यांत मोठासा धोका नसतो. परंतु ज्यांना गिऱ्हाअिकाची चाड असते अशाही वेश्या असतात आणि त्या अशा रीतींने

वागत नाहीत. ५. आपण जें विधान आम्हास चिकटवलें आहे, तें आम्ही केलेलें नाही. पुरुषांनी फसवल्यामुळें दुसरा मार्गच न राहिल्यामुळें वेश्यांना हा धंदा करावा लागतो, असें जे नीतिबाज म्हणतात, त्यांचें म्हणणें फक्त दहा टक्के वेश्यांच्या बाबतींत खरें असतें, पण बहुतेक वेश्या पैसे मिळविण्याचा सोपा मार्ग म्हणूनच धंदा करतात आणि त्यांना कोणी नोकरी देऊं केली तरी देखील त्या धंदा सोडायला तयार नसतात, असें आम्ही म्हणतों. अर्थात् ज्यांना कामेच्छा विशेष प्रमाणांत असते, त्यांची कामपूर्ति अेका माणसाला करणें अशक्य असतें, म्हणूनही कांही स्त्रिया या धंद्यांत पडतात, परंतु त्यांचें प्रमाण अर्थातच १० टक्के नसतें. ज्यांना स्वतःला संभोगापासून सुख होत नाही, अशाच पुष्कळ असतात आणि अशांनाच धंदा शक्य होतो, कारण कामपूर्तीनें शरीरावर जो ताण पडतो, तो प्रत्येक वेळीं पडूं लागल्यास धंदा अशक्य होअील. परंतु अशा स्त्रियांचाही अेखादा प्रियकर असतो आणि त्याच्याकडून त्यांना कामपूर्तीचें समाधान मिळतें. तथापि ज्या वेश्या धंद्यांत वाकबगार असतात, त्या समाधान झाल्याचें नाटक मात्र करतात आणि तसें केल्यास गिऱ्हाअीक खुष होऊन पुनः पुनः त्यांच्याकडे जाण्याचा संभव असतो. दारांत बसून जाणाऱ्या येणाऱ्याला ओढण्याचा प्रयत्न करणाऱ्या वेश्या अर्थातच हलक्या दर्जाच्या असतात. त्या सुखी नसल्यास नवल नाही. खालच्या दर्जाचीं माणसें कोणत्याच धंद्यांत सुखी होत नाहीत. परंतु सर्वच वेश्या तशा नसतात. अर्थातच जे नीतिबाज लोक वेश्यांना धंद्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात, त्यांचे सुतकी चेहेरे पाहिल्यावर कोणत्या वेश्येचा उल्हास शिल्लक राहील ? परंतु नेहमी उल्हासित दिसणाऱ्याही वेश्या पुष्कळ असतात. ६. ज्या मुलीबद्दल आपल्याला अगोदरच शंका आहे, तिच्याशीं लग्न न करणेंच बरें. **सं.**

२

( सारांश ) वय २७ वर्षें, उंची ५ फूट, अडीच अिंच, वजन १०६–७ पौंड, रंग गोरा, जात कोंकणस्थ ब्राह्मण. माझी वृत्ति साधारण धर्मभीरु,

सरळ व प्रेमळ आहे. वयाचीं १२ वर्षे खेडेगांवांत काढल्याने तोंपावेतों कामविषयक माहिती मुळींच नव्हती. त्यानंतर अचानक शहरांत रहावें लागलें. मी चांगलाच देखणा व असमंजस असल्यामुळें अेका मोठ्या मुलाने माझ्यावर भलताच प्रयोग केला व त्यानंतर माझ्या मनांत अेकसारखे मुलांचेच विचार येऊं लागले. चवदाव्या वर्षापासून स्वप्नें पडूं लागलीं, पण तीं देखील मुलांचींच. स्त्रियांबद्दल मला जोरदार आकर्षण कधींच वाटलें नाही. माझा अेक वडील भाऊ सरकारी नोकरींत आहे व मीही सरकारी नोकर असल्यामुळें आअी लग्नाचा आग्रह करीत असे. पण मला लग्न करावेंसें वाटलें तरी मी नाही म्हणत असें. आतां गेल्या महिन्यांत आअी वारल्यामुळें मला लग्न करणें आवश्यक झालें आहे. मधें निवडणुकींच्या धामधुमींत मुलींशीं संबंध आल्याने मुलींविषयींही आकर्षण वाटूं लागलें आहे. पण माझ्यांत पुढील दोष आहेत त्यांवर औषधें सुचवावीं, किंवा ते दोष नसल्यास तसें कळवावें. अिंद्रियांत आकाराच्या व उत्थापनाच्या दृष्टीने कमतरता आहे, पण अेका डाक्तराने सांगितलें की त्याला हरकत नाही. पण ते यांतले तज्ञ नसल्यामुळें आपणांस तकलीफ देत आहें. या दोषावर कांही उपाय आहे काय ? मीं आपलें ' क्लैब्याची मीमांसा ' हें पुस्तक वाचलें आहे, पण त्यांत समसंभोगाची फारशी माहिती नाही. तेव्हां मी बायकोला सुखी करूं शकेन काय ? मी लग्न करणें अगदींच उचित नसल्यास करणार नाही. आपला ० ० ०

उ. आपणांस मुलांविषयीं व मुलींविषयींही आकर्षण वाटतें असें दिसतें. असे कांही लोक असतात आणि ते कधीं कधीं सुखीही होतात. आकारावर कोणताही उपाय नाही. उत्थापनावर उपाय पुस्तकांत दिले आहेत, पण ते डाक्तरांनाच करतां येतील. कोणताही मनुष्य पत्नीला सुखी करूं शकेल की काय हें सांगणें अशक्य आहे. तें प्रत्यक्ष अनुभवाशिवाय कळत नाही व हा अनुभव घेण्यास समाजाची परवानगी नसते. हा विवाहसंस्थेचा दोष आहे व ज्यांना ती संस्था पाहिजे असेल त्यांनी या दोषाचे परिणाम काय होतील ते सोसले पाहिजेत. अेकंदरींत आपण लग्न करूं नये असें आमचें मत आहे. **सं.**

३

वय १९ वर्षे. तीनचार वर्षांपूर्वी हस्तमैथुनाची संवय लागली होती, परंतु नंतर लवकरच कळून आलें की हें आपल्या शरीराला फार अपायकारक आहे, म्हणून मीं ती सोडून दिली. परंतु तेव्हांपासून स्वप्नावस्था होते व आतां हें प्रमाण महिन्यांतून चारपांच वेळां अितकें वाढलें आहे. मी अेका तज्ञ डाक्तराकडे गेलों. त्याने तपासून 'हस्तमैथुन केलें आहे काय' असें विचारलें, तेव्हां मी होय म्हटलें. तो म्हणाला उद्यां दहा रुपये घेऊन ये म्हणजे मी तुला गोळ्या देअीन, पण मी परत त्याच्याकडे गेलों नाही. मी गेल्याच वर्षी अेस्. अेस्. सी. पास झालों, पण या रोगामुळें पुढील शिक्षण बंद ठेवलें. स्वप्नदोषामुळें शरीराच्या कोणत्याच अवयवाची वाढ होत नाही. हा रोग ऑपरेशन किंवा कितर उपायांनी बंद होअील काय ? आपण योग्य तो सल्ला द्यावा. आपला ० ० ०

उ. आपला डाक्तर फारसा तज्ञ आहे असें दिसत नाही, कारण तज्ञ डाक्तर असा प्रश्न विचारीत नाहीत व त्यावर गोळ्या देतों म्हणूनही सांगत नाहीत. हस्तमैथुनाचे वाअीट परिणाम त्या संवयीने होत नसून फक्त भीतीने होतात, असें आधुनिक तज्ञांचें मत आहे. स्वप्नावस्था होणें नैसर्गिक आहे. शरीराची वाढ खुंटली असेल तर त्याला वेगळीं कारणें असलीं पाहिजेत, त्याकरतां अेखाद्या चांगल्या डाक्तराकडे जा, परंतु हस्तमैथुनाचा तो परिणाम आहे ही कल्पना सोडून द्या. या कल्पनेने पुष्कळांचें नुकसान होतें व आपलेंही झालें आहे. पुढील शिक्षण बंद केलें, यावरून आपला घाबरटपणा दिसतो, **सं.**

---

# शारदेचें पत्र

ब्रिटिशांनी आमचे कितीही अपराध केलेले असले, तरी निकराची वेळ आल्यावर त्यांनी हिंदुस्थान सोडून जाण्याअितकी अक्कल दाखवली आणि त्यांना कॉम्युनिस्टांच्या भीतीमुळें हा पळ काढावा लागला हें जरी खरें, तरी

त्यांनी त्यांतल्या त्यांत हिंदुस्थानला स्वराज्य दिल्याचा आव आणला आणि हिंदुस्थानशीं मैत्रीचे संबंध राखले, ही खरी मुत्सद्देगिरी आहे यांत शंका नाही. अर्थात् जातां जातां त्यांनी हिंदुस्थानला अनेक अडचणी उपस्थित करून ठेवल्या, याचें कारण जित्याचा स्वभाव मेल्याशिवाय जात नाही अितकेंच. सर्व संस्थानें स्वतंत्र झालीं ही घोषणा, हैदराबादचा आणि काश्मीरचा घोटाळा, पाकिस्तानची निर्मिति, या सगळ्या त्यांच्याच कारवाया आहेत आणि वाटाघाटी करायला मिळाले गांधींसारखे संत-मुत्सद्दी! तेव्हां हें असें व्हायचेंच. पण निदान ब्रिटिशांनी निघून जाण्याची अक्कल दाखवली हें काय थोडें आहे? लढाअी करून त्यांना येथून घालवणें अशक्य होतें हें कोणालाही समजतें.

अेकंदरींत माणसें कितीही सुधारलीं असलीं तरी राष्ट्रांच्या अंगीं अजून माणुसकी आलेली नाही. ती आली असती तर युनोसारख्या संस्थांचा कांही उपयोग झाला असता, पण या संस्था शांतता राखण्याचें काम देखील न करतां स्वतःच युद्धाला प्रोत्साहन देतात याला काय म्हणावें? यूनोच्या ध्यानांत स्वतःची विफलता आलेली नाही असें नाही, म्हणूनच ते राजकारणाव्यतिरिक्त पाहिजे ते उपद्याप करीत असतात. आरोग्यरक्षणाचें डोंग करून संततिनियमनाचे योग्य उपाय सर्वत्र पसरवण्याअैवजीं ही संस्था धार्मिक लोकांच्या कारवायांना बळी पडून डॉ. स्टोनसारख्यांना भलत्याच खोट्या उपायांचा प्रसार करण्याकरतां हिंदुस्थानांत पाठवतात, फ्रान्समधील वेश्यांची उत्तम ठरलेली व्यवस्था बंद करायला लावून वेश्यांना काळा बाजार करायला लावतात, आणि त्यामुळें रोगांचा प्रसार झपाट्यानें झाला तरी धार्मिक लोकांना रोगांची काय पर्वा असते? ते तर उघडपणें बोलून दाखवतात की हे रोग दुर्वर्तनाला शिक्षा म्हणून अीश्वराने पाठवलेले असतात. या रोगांवर कोणीही उपचार करूं नये, असें फर्मान ते काढीत नाहीत हेंच नशीब! या धार्मिक लोकांचा सुळसुळाट जोंपर्यंत बंद झाला नाही, तोंपर्यंत जगांत कोणाचीही प्रगति होणें शक्य नाही.

याप्रमाणें यूनोला राजकारण करायचें नसल्यामुळेंच ते स्वयंनिर्णयाचा

हक्क मान्य करीत नाहीत, कारण अजूनही साम्राज्यशाही नष्ट झालेली नाही आणि मोठमोठीं राष्ट्रें अजूनही हिंस्र पशूंप्रमाणें पंजांत सांपडलेल्या लोकांना स्वातंत्र्य द्यायला तयार नाहीत. हें जोंपर्यंत चालू आहे, तोंपर्यंत हिंदुस्थान स्वतंत्र झालें म्हणण्यांत काय अर्थ आहे? त्यांतल्या त्यांत हिंदुस्थानचे जे भाग फ्रान्सच्या आणि पोर्त्युगलच्या ताब्यांत आहेत, त्यांत अेक मोठा फरक आहे की पोर्त्युगल हा देश प्रथमपासूनच फ्रान्सपेक्षां रानटी आहे. यामुळें हिंदुस्थानांतला आमचा पाय आम्ही काढणार नाही, असें पोर्त्युगलला उघड म्हणायला लाज वाटत नाही, पण फ्रान्सला लाज वाटते. तेही दिरंगाअी लावीत आहेत यावरून त्यांची नाखुषी तर दिसतेच, पण शेवटीं त्यांना लाजेकाजेस्तव आपला पाय काढावा लागेल यांत शंका नाही. पोर्त्युगल रानटीच असल्यामुळें त्याला लोकमताची पर्वा नाही आणि ते सरळ उघडपणें 'आम्ही जाणार नाही' असें उद्दामपणाने सांगत आहेत. खरें पाहिलें तर हिंदुस्थानसरकारने मनांत आणलें तर गोवा काबीज करणें हैदराबादपेक्षां कठिण जाणार नाही, पण आमचें सरकार युद्ध करणार नाही ही त्यांची खात्री आहे आणि या खात्रीला बराच आधार आहे. ही खात्री केवळ भारतसरकारच्या अहिंसेच्या घोषणेवर अवलंबून नाही, तिला भक्कम आधार आहे. कारण पोर्त्युगलचा व अिंग्लंडचा अेक फार जुना तह आहे आणि त्यामुळें अेकमेकांना मदत करण्याची जबाबदारी दोघांवरही आहे. अर्थात् हा तह पूर्वी ज्या काळांत परकी देशांचीं भांडणें हिंदुस्थानांत चालू होतीं, तेव्हां फ्रेंचांना गप्प बसवण्यासाठीं केलेला असावा, परंतु तो अजून चालू असल्यामुळें हिंदुस्थानांतला पोर्त्युगीज मुलूख जबरदस्तीने ताब्यांत घेण्याचें भारताने ठरवल्यास त्याला अिंग्लंडचा विरोध येअील, म्हणून पोर्त्युगलच्या गमजा चालल्या आहेत आणि अिंग्लंडशीं भांडण करणें भारताला परवडणार नाही. पण हे भाग जोंपर्यंत परकी राष्ट्रांच्या ताब्यांत आहेत, तोंपर्यंत हिंदुस्थान स्वतंत्र झाला असें मी तरी समजत नाही. स्वतः बंड करून पोर्त्युगिजांना घालवून देण्याची ताकद गोव्याच्या लोकांच्या अंगीं नाही, परंतु त्याशिवाय

दुसरा मार्ग सध्या दिसत नाही.

नवे मंत्री अेकदांचे नेमून झाले. पं. नेहरूंना महाराष्ट्रीयांची बरीच भीति वाटते यांत शंका नाही. मुंबईच्या मंत्रिमंडळांतल्या नेमणुका त्यांच्याच सल्ल्याने झालेल्या आहेत आणि मुरारजी देसायांना मुख्य मंत्री करून त्यांचें समाधान झालें नाही. कोयना योजना पक्की गाडली जावी अशी व्यवस्था त्यांनी करून ठेवली आहे, कारण डॉ. जीवराज मेहता महाराष्ट्राचे शत्रु हें माहीत असतांना त्यांच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या दिल्या आहेत, तेव्हां बिचाऱ्या नाअीक निंबाळकरांना कांही करतां येणार नाही. दिल्लीसरकारचे मंत्रि नेमतांना देखील अशीच खबरदारी घेतलेली आहे. डॉ. आंबेडकर कसे असले तरी महाराष्ट्रीय होते, पण त्यांनी आपल्या पायावर स्वतःच धोंडा पाडून घेतला होता. काकासाहेब गाडगिळांनी नेहरूंना कधीं प्रत्यक्ष विरोध केला नसेल, पण कोयना धरण आणि संयुक्त महाराष्ट्र या दोहोंना त्यांचा पाठिंबा असे, म्हणून त्यांनाही डिच्चू मिळाला. अेकंदरींत नेहरूंना महाराष्ट्रीयांची भीति वाटते हेंच खरें. आतां देशमुख अर्थमंत्री झाले आहेत हें खरे, पण ते फारशी गडबड करणार नाहीत असा विश्वास नेहरूंना वाटत असला पाहिजे. ब्रिटिश सरकार देखील महाराष्ट्राला भीत असे आणि तेंच धोरण नेहरूंनी पुढें चालवलें आहे. अशा स्थितींत नेहरूंना विरोध करणें महाराष्ट्रीयांचें कर्तव्यच होऊन बसतें. नालायक मंत्री नेमण्याची नेहरूंना हौसच दिसते, कारण राजकुमारी अमृत कौर सारखी नालायक ठरलेली बाअी पुनः आरोग्यमंत्री म्हणून आमच्या डोक्यावर त्यांनी आणखी पांच वर्षे लादली आहे. या बाअींना आरोग्याबाबत तिळमात्र ज्ञान नाही, पण मुरारजींप्रमाणें नेहरूंनाही वाटत असावें की कदाचित् कोणी जाणता मंत्री नेमला, तर त्याचा पूर्वग्रह झालेला असल्यामुळें त्याच्या हातून चांगलें काम होणार नाही. अशा रीतीने ज्याला ज्या विषयांत कांही कळत नाही तोच विषय त्याच्याकडे दिला, की पूर्व-ग्रहाला जागा रहात नाही. मग अज्ञानामुळें काय अनर्थ होतील तेवढेच, पण पूर्वग्रह तर नाहीत !

चांगलें धान्य हल्ली कोणालाच मिळत नाही याचा अर्थ काय? निदान जेथें तें पिकतें तेथल्या लोकांना तरी तें मिळत नाही हें सर्वांना माहीत आहे. चांगला तांदूळ मुंबअींत पिकतो, पण हल्ली तो कोणाला पहायला तरी मिळतो आहे का? या तांदुळाचें होतें काय? तो दुसऱ्या कोठेतरी नेऊन विकीत असतील, तर जनतेचा पैसा सरकार निष्कारण वाहतुकींत खर्च करतें असा त्याचा अर्थ होतो. याचा फायदा कोणाला मिळतो? तो बड्या सरकारी अधिकाऱ्यांकरतां राखून ठेवलेला असतो काय? असला तर काय म्हणून? हें चांगलें धान्य जर सरकार नाहीसें करीत नसेल, तर त्याचें होतें काय? त्याचा काळा बाजार होत असला पाहिजे असें सरळ अनुमान निघतें. सोलापूरला उत्तम ज्वारी होते, पण ती कोणाला दिसत नाही. लोकांना दिसतो मिलो, आणि तो म्हणे हल्ली स्वस्त केला आहे. पण आमची चांगली ज्वारी काय होते? कांहीं झालें तरी याची जबाबदारी सरकारवरच येते. जनतेची ही फसवणूक सरकारने काणाडोळा केल्याशिवाय होत नाही. काळा बाजार सरकारला बंद करतां येत नसेल तर तीही शरमेची गोष्ट आहे. मुनशी गेले अन् दुसरे कोणी आले, तरी यांत कांही फरक होअील असें दिसत नाही.

निवडणुकी झाल्या आणि आपली बैठक कायम झाली, हें ठरल्याबरोबर सरकारने पुन्हा गरिबांवर जुलूम करायला सुरवात केली आहे. ‘पहा आम्ही कशा किंमती उतरवल्या?’ अशी फुकटची घमेंड त्यांनी नुकतीच मारली होती आणि आतां गरिबांचें मुख्य अन्न जें धान्य, त्याच्याच किंमती वाढवून ते त्यांच्या पोटावर पाय आणतात! सत्याग्रहांत सेनापति बापटांसारखीं माणसें तुरुंगांत जात असलेलीं पाहून वाटतें की अजून ब्रिटिश राजवटच सुरू आहे की काय? पण नाही, ब्रिटिश राजवट देखील यापेक्षां बरी होती.

तुझी शारदा

---

**समाजस्वास्थ्य** मासिक दर १४ तारखेला टपालांत पडतें. वर्गणी रु. ३, व्ही. पी. ने रु. ३-६-०

# आमचेकडे मिळणारा माल

## किंमती कमी केल्या !

**लॅबट डच कॅप,** रु. ६. **अमेरिकन,** रु. ८. **उभट टोपी,** रु. १॥. **कॉट्रॅसेप्टॅलीन** (देशी जेली, मोठी नळी) रु. ३. **कोरोमेक्स जेली** (अमेरिकन, मोठी नळी) रु. ५. **पिशव्या,** ४ आणे, ८ आणे, रु. १।. **भोंवऱ्याची पिचकारी,** रु. ७. **राअिटयूब** (रोगप्रतिबंधक), रु. १-२-०, डझनास रु. १३.

**राइट एजन्सी,** १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

**पॅरिसच्या परी,** दुसरी आवृत्ति विक्रीस तयार, रु. ३. **या पुस्तकाची जाहिरात केसरीने नाकारली आहे.**

**प्रो. ना. सी. फडके** यांचीं पुस्तकें :—

**प्रतिभासाधन,** रु. ५. **महात्मा गांधी,** रु. १॥. **किशोर-कथा,** रु. १॥. **भरतीची लाट** (कादंबरी), रु. ४. **माझ्या साहित्यसेवेंताल स्मृति** भाग २ रा, रु. ३. **शाकुंतल** (जप्त झालेली कादंबरी) रु. ४.

**राअिट अेजन्सी,** १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

Registered No. B 2289.


## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. क्लैब्याची मीमांसा, किंमत रु. ६, ट. ख. ८ आणे
२. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु., ट. ख ८ आणे
३. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], ५ वी आवृत्ति
किंमत रु. ४, ट. ख. ८ आणे.
४. संततिनियमन [सचित्र], १० वी आ. १। रु. ट. ख.७ आ.
५. गुप्त रोगांपासून बचाव, ४ थी आ.रु.१, ट.ख.७आणे.
६. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग २ रा [ वर्षें ४-५-६ ], किं. २-०-०, ट. ख.८ आ.
७. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ७ आ.
८. गुरुबाजी ( नाटक ), किं. ८ आ., ट. ख. ७ आणे
९. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ८ आ.
१०. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ७ आ.
११. न्यायाचा शोध (नाटक), किं १ रु., ट. ख. ७ आ
१२. पॅरिसच्या परी ( दुसरी आवृत्ति ) रु. ३

### डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५ आ.
२. मूळव्याध, किं. ४ आ.

### श्री. शकुंतला परांजपेकृत

Three years in Australia, Rs. 3/15. Postage As. 8

राइट एजन्सी, नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, मुंबई नं. ४.


मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई-७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई-४